# Mumbai-Ahmedabad Bullet Train

# Coverage report for

# NHSRCL’s statement on employment generation

## September 17, 2020

## Lokmat, Mumbai, Thane, Page 02, September 18, 2020,

**९० हजार जणांना मिळणार रोजगार :**
५१ हजार कुशल तंत्रज्ञांचा समावेश

# बुलेट ट्रेनसाठी ७५ लाख मे. टन सिमेंट, २१ लाख मे. टन हवे पोलाद

नारायण जाधव ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ४६० किमी लांबीचे व्हायाडक्ट्स, समुद्राखालून जाणाऱ्या सात किमी लांबीच्या बोगद्यासह २६ किमी लांबीचे बोगदे, २७ पोलादी पूल, १२ स्थानके आणि इतर संरचनांच्या निर्मितीसाठी ७५ लाख मेट्रिक टन सिमेंट आणि २१ लाख मेट्रिक टन पोलाद लागणार आहे.



या प्रकल्पासाठी विविध श्रेणींमधील ९० हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत तसेच त्याच्याशी संबंधित
पुरवठासाखळी आणि संबंधित सेवा यांसाठीही मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. प्रकल्पाच्या बांधकामाशी संबंधित विविध कामांसाठी ५१ हजारांहून अधिक तंत्रज्ञ, कुशल आणि अकुशल कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे.

अकुशल कामगारांना बांधकामाशी संबंधित प्रशिक्षणाचे काम एनएचएसआरसीएलने सुरु केले असून त्यात बार बेंडिंग, टाइल लेइंग, इलेक्ट्रिकची कामे, कॉंक्रिटिंग, प्लास्टरिंग इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या प्रशिक्षणातून अकुशल कामगारांना रोजगाराभिमुख करण्याबरोबरच त्यांना उत्पन्नाच्या संधीही प्राप्त होणार आहेत, अशी माहिती प्रवक्ता सुषमा गौर यांनी शुक्रवारी दिली.

### आतापर्यंत ६४ टक्के भूसंपादन

प्रकल्पासाठी आतापर्यंत ६४ टक्के जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. त्यात गुजरात आणि दादरा-नगर-हवेलीमधील ८२ टक्क्यांहून अधिक तर महाराष्ट्रातील २३ टक्के जमिनीचा समावेश आहे.

### दोन महिन्यांत निविदांना अंतिम स्वरूप

बांधकामाशी संबंधित काही महत्त्वाच्या निविदा उघडल्या जाणार असून येत्या दोन महिन्यांमध्ये त्यांना अंतिम स्वरुप देण्यात येणार आहे. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

या निविदा मुख्यत: संरचना आणि बांधकामाशी संबंधित असतील, यात व्हायाडक्ट्स, पूल, मेंटेनन्स डेपो, स्थानके (वापी, बिलिमोरा, सुरत आणि भरुच आणि सुरत डेपो, अंदाजे २३७ किमी) याबरोबरच व्हायाडक्ट आणि पूल, क्रॉसिंग पूल, मेंटेनन्स डेपो आणि स्थानके (आणंद/नडियाद, बडोदा आणि अहमदाबाद यादरम्यान अंदाजे ८८ किमी) या कामांचा समावेश असेल.

तसेच रस्ते/नद्या/रेल्वे/इतर संरचना यांच्यावरुन बुलेटचा मार्ग जाणार असल्याने ३३ पुलांची उभारणी करावी लागणार आहे. यासंदर्भातील खरेदी, फॅब्रिकेशन, चेक-असेम्ब्ली इत्यादी कामांचाही या निविदांमध्ये समावेश असेल.

**Summary:** 75 lakh MT cement and 21 lakh MT steel is expected to be consumed for creating 460 km long viaduct, 26 km long tunnels including 7 km undersea tunnel, 27 steel bridges, 12 stations and many more supporting super structures. These industries will provide over 90,000 employment opportunities in various categories, linked supply chain and allied services. More than 51000 technicians, skilled and unskilled work force will be required for various construction related activities. NHSRCL is already exploring possibilities for providing trainings to unskilled labourers in various construction related disciplines to improve their chances of employability, informed spokesperson Sushma Gaur on Friday. Some important construction related tenders are expected to be opened and finalised in next couple of months, which will give a boost to the economy of the nation.

# Apla Mahanagar, Mumbai, Thane, Page 03, September 18, 2020,

Apla Mahanagar_Mumbai_P-03_18 September 2020

## मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी होणार मेगाभरती

खास प्रतिनिधी • मुंबई

बुलेट ट्रेनच्या प्रकल्पादरम्यान एकूण ९० हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी मिळतील असे नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये कर्मचारी आणि अधिकारी अशा दोन श्रेणी अंतर्गत भरती प्रक्रिया राबवली जाईल. थेट नोकरीची संधी तसेच अप्रत्यक्ष रोजगारही मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे एनएचआरसीएलमार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

**९० हजार उमेदवारांना मिळणार रोजगार**

एनएचआरसीएलमार्फत सुरू असलेल्या कामामध्ये प्रत्यक्षपणे ५८ हजार लोकांना रोजगार मिळेल. एकूण ५१ हजार कुशल आणि अकुशल कामगारांसाठीची ही भरती असेल. तर ७ हजार इतक्या मोठ्या प्रमाणात अभियंते आणि पर्यवेक्षक यांना रोजगार मिळेल. अप्रत्यक्षपणे नोकरी मिळणाऱ्यांची आकडेवारी ३४ हजार इतकी आहे. मुंबई अहमदाबाद एचएसआर प्रकल्प प्रकल्पांच्या बांधकाम टप्प्यात विविध प्रकारात ९० हजारांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करेल. ज्यामुळे देशाची वाढ आणि समृद्धी होईल असा विश्वास एनएचआरसीएलचा वाटतो.

बांधकाम संबंधित विविध कामांसाठी ५१००० हून अधिक तंत्रज्ञ, कुशल आणि कौशल्य नसलेले कार्य बल आवश्यक असेल. एन.एच.एस.आर.सी.एल. काम नसलेल्या मजुरांना नोकरी आणि त्यांच्या चांगल्या कमाईतील बदलांमध्ये सुधारणा करण्यासाठी बार-वाकणे, टाइल घालणे, बांधकाम विद्युत कामे, कॉन्ट्रीटिंग, प्लास्टरिंग इत्यादी विविध बांधकाम संबंधित शाखांमध्ये प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याच्या शक्यतेचा आधीच आढावा घेत आहे. ट्रॅक टाकण्याच्या कामासाठी आवश्यक असणाऱ्या विशेष प्रशिक्षणांची व्यवस्था एनएचएसआरसीएल कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांसाठी करण्यात येईल. एमएएचएसआर प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात ३४००० पेक्षा जास्त अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी देखील निर्माण केल्या जातील. या कामादरम्यान ७५ लाख मेट्रिक टन सिमेंट आणि २१ लाख मेट्रिक टन स्टीलचा वापर करण्यात येईल. तर ४६० किमी लांबीचा व्हायडक्ट, २६ किमी लांब बोगदा, ७ किमी समुद्राखाली भुयारी टनेल, २७ स्टीलचे पूल, १२ स्टेशन्स आणि बऱ्याच सुपर स्ट्रक्चर्स तयार करण्यासाठी या कामगारांचा वापर करण्यात येईल.

### प्रकल्पाचे ६४ टक्के भूसंपादन पूर्ण

बुलेट ट्रेनच्या प्रकल्पासाठी आतापर्यंत ६४ टक्के भूसंपादन पुर्ण झाले आहे. त्यामध्ये गुजरात आणि दादरा नगर हवेली येथील ८२ टक्के भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर महाराष्ट्रात २३ टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे.

**Summary:** The Mumbai Ahmedabad HSR project will create more than 90,000 direct and indirect jobs including two levels: employee and officer, informed NHSRCL. Around 58000 employment opportunities will be generated directly through NHSRCL. More than 51000 technicians, skilled and unskilled work force will be required for various construction related activities whereas 7000 engineers and supervisors will also be appointed. More than 34000 indirect employment opportunities will also be generated. This will lead to growth and prosperity of the country, informed NHSRCL. 75 lakh MT cement and 21 lakh MT steel is expected to be consumed for creating 460 km long viaduct, 26 km long tunnels including 7 km undersea tunnel, 27 steel bridges, 12 stations and other structures. These industries will provide employment opportunities in various categories, linked supply chain and allied services.

**Navrashtra, Mumbai, Page 03, September 20, 2020,**

Navrastra_Mumbai_P-03_20 September 2020

# बुलेट ट्रेन देणार हजारो नोकऱ्या

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशात कोरोनाचा संसर्ग वाढत असताना अनेक कंपन्यांची आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम करण्याची परवानगी दिली तर काही कंपन्यांचे ऑफिस बंद झाल्याने कर्मचाऱ्याचा रोजगार देखील गेला. मात्र, बेरोजगार तरुणांसाठी दिलासादायक बातमी आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत बांधकामादरम्यान 90 हजारांहून अधिक लोकांना रोजगार मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 1 लाख कोटींपेक्षा जास्त किमतीच्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची अंमलबजावणी करणाऱ्या नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशनने ही घोषणा केली आहे. या बांधकामाच्या वेळीच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे 90 हजारांहून अधिक रोजगार निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. महामंडळाच्या प्रवक्त्या सुषमा गौर दिलेल्या माहितीनुसार, 51 हजारांपेक्षा जास्त तंत्रज्ञ, कुशल आणि अकुशल कामगारांची आवश्यकता आहे, यामध्ये तंत्रज्ञ आणि कुशल व अकुशल कामगारांची आवश्यकता आहे.



## 90 हजारांहून अधिक लोकांना मिळणार रोजगार

दरम्यान, जपान सहाय्य प्रकल्प असलेल्या बुलेट ट्रेनच्या कामाचे औपचारिक उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर 2017 मध्ये जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिंजो आबे यांच्या उपस्थितीत अहमदाबाद येथे करण्यात आले होते. याचेच बांधकाम सुरू झाल्यावर अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत.

## कुशल कामगारांची आवश्यकता

460 किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या या ट्रॅकमध्ये एकूण 26 किलोमीटर बोगदे, 27 लोखंडी पूल, 12 स्टेशन्स आणि 7 किलोमीटर अंडरग्राऊंड बोगदे, इतर सुपर स्ट्रक्चर्स आहेत. बांधकाम चालू असताना 75 लाख टन सिमेंट आणि 21 लाख टन स्टील वापरण्याचा अंदाज असण्याची माहिती देखील देण्यात आली

## विशेष प्रशिक्षण

बुलेट ट्रेनसाठी तंत्रज्ञ आणि कुशल व अकुशल कामगार लागणार आहेत. लोकांना विविध संबंधित कामांसाठी प्रशिक्षण देणार आहे. ट्रॅक लावण्यासाठी, कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याची व्यवस्थाही कॉर्पोरेशन करणार आहे.

**Summary:** The Mumbai Ahmedabad HSR project will create more than 90,000 direct and indirect jobs in various categories during construction phase of the project announced NHSRCL. More than 51000 technicians, skilled and unskilled work force will be required for various construction related activities said NHSRCL's spokesperson Sushma Gaur. NHSRCL is already exploring possibilities for providing trainings to unskilled labourers in various construction related disciplines like bar bending, tile laying, construction electrical works, concreting, plastering etc. 75 lakh MT cement and 21 lakh MT steel is expected to be consumed for creating 460 km long viaduct, 26 km long tunnels including 7 km undersea tunnel, 27 steel bridges, 12 stations and many more supporting super structures.

**Dabbang Duniya, Mumbai, Page 02, September 20, 2020,**

# संक्षिप्त समाचार

## बुलेट ट्रेन परियोजना से 90 हजार से अधिक लोगों को रोजगार का दावा



**दबंग रिपोर्टर, पालघर।** देश की महत्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन परियोजना को क्रियान्वित करने वाले नेशनल हाई स्पीड रेल कारपोरेशन (एनएचएसआरसीएल) ने कहा है कि इसके निर्माण के दौरान ही प्रत्यक्ष और परोक्ष दोनो मिलाकर 90 हजार से अधिक रोजगार के अवसर पैदा होंगे। एनएचएसआरसीएल की प्रवक्ता सुषमा गौर ने कहा कि निर्माण सम्बंधी काम के लिए 51000 से अधिक टेक्निशियन तथा कुशल और अकुशल कामगारों की जरूरत होगी। कारपोरेशन ऐसे लोगों को विभिन्न सम्बंधित कामों के लिए प्रशिक्षण देने की सम्भावनाएं तलाश रहा है। पटरी बिछाने के लिए कारपोरेशन ठेकेदारों के कर्मियों के विशेष प्रशिक्षण की भी व्यवस्था करेगा। उन्होंने बताया कि निर्माण के दौरान 34000 से अधिक अप्रत्यक्ष रोजगार के अवसर भी पैदा होंगे। 480 किमी से अधिक लम्बी इस पटरी में 460 किमी लम्बा वायाडक्ट (जमीन के ऊपर बनी पुलनुमा संरचना) और समुद्र के नीचे 7 किमी समेत कुल 26 किमी लम्बी सुरंगें, 27 लोहे के पुल, 12 स्टेशन और कई अन्य सहायक सुपर संरचनायें होगी। इसके निर्माण के दौरान 75 लाख टन सीमेंट, 21 लाख टन स्टील का इस्तेमाल होने का अनुमान है। इससे भी सम्बंधित उद्योगों और उनसे जुड़ी आपूर्ति शृंखला में रोजगार के अतिरिक्त अवसर पैदा होंगे। गौर ने बताया कि निर्माण सम्बंधी कुछ महत्वपूर्ण कामों के लिए निविदाएँ अगले दो माह में खुलेंगी और उन्हें अंतिम रूप दिया जाएगा।

---

# Snapshot from Times Now Marathi (Online)

## बुलेट ट्रेन देणार हजारो रोजगार

काम-धंदा

टाइम्स नाऊ मराठी
Updated Sep 18, 2020 | 17:00 IST

mumbai-ahmedabad bullet train मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे लवकरच ९० हजारांपेक्षा जास्त प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.



बुलेट ट्रेन | फोटो सौजन्य: Representative Image

**थोडं पण कामाचं**

- बुलेट ट्रेन देणार हजारो रोजगार
- मंदावलेल्या अर्थव्यवस्थेसाठी बुलेट ट्रेन प्रकल्प एक बूस्टर डोस ठरण्याची चिन्हं
- लवकरच ९० हजारांपेक्षा जास्त प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार

**मुंबई:** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन (mumbai-ahmedabad bullet train) प्रकल्पामुळे लवकरच ९० हजारांपेक्षा जास्त प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे. एका प्रकल्पातून एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार असल्यामुळे अर्थचक्राला गती मिळण्यास मोठी मदत होणार आहे. कोरोना संकटामुळे (corona crisis) मंदावलेल्या अर्थव्यवस्थेसाठी बुलेट ट्रेन (bullet train) प्रकल्प एक बूस्टर डोस ठरण्याची चिन्हं दिसत आहेत. बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे देशात मोठ्या प्रमाणावर नवे तंत्रज्ञान येईल. अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास प्रकल्प सहाय्यक ठरेल. (Mumbai-Ahmedabad bullet train corridor will create 90,000 direct and indirect jobs)

बुलेट ट्रेन प्रकल्पात वेगवेगळ्या प्रकारची कामं करण्यासाठी ५१ हजारांपेक्षा जास्त तंत्रज्ञ, कुशल आणि अकुशल कर्मचा-यांची गरज भासणार आहे. अकुशल कामगारांना बांधकामाशी संबंधित विविध कामांचे प्रशिक्षण देण्याचे काम एनएचएसआरसीएलने (National High Speed Rail Corporation Limited - NHSRCL) सुरू केले असून त्यात बार बेंडिंग, टाइल लेइंग, इलेक्ट्रिकची कामे, कॉंक्रिटिंग, प्लास्टरिंग इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या कामांच्या प्रशिक्षणातून

**Summary:** The Mumbai Ahmedabad HSR project will create more than 90,000 direct and indirect jobs in various categories during construction phase of the project which would lead to growth and prosperity of the country. More than 51000 technicians, skilled and unskilled work force will be required for various construction related activities. NHSRCL is already exploring possibilities for providing trainings to unskilled labourers in various construction related disciplines like bar bending, tile laying, construction electrical works, concreting, plastering etc to improve their changes of employability and better earnings. The specialised training required for track laying will also be arranged by NHSRCL to the contractor's employees.

More than, 34000 indirect employment opportunities will also be generated during the construction phase of the MAHSR project. These industries will provide employment opportunities in various categories, linked supply chain and allied services. Some important construction related tenders are expected to be opened and finalised in next couple of months, which will give a boost to the economy of the nation.

Other technical information as mentioned in the statement has also been mentioned in the article

**Full news on:** https://www.timesnowmarathi.com/business-news/article/mumbai-ahmedabad-bullet-train-corridor-will-create-90000-direct-and-indirect-jobs/313341